


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २५१ ●बुधवार,दि.१० डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# 'बदनेकडून महिला डॉक्टरचं शारीरिक शोषण'

## फडणवीसांनी सभागृहात दिली धक्कादायक माहिती



**नागपूर । प्रतिनिधी**

फलटण महिला डॉक्टर मृत्यू प्रकरणात विधासनभेत प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तर दिलं. महिला डॉक्टरने आत्महत्या केली आणि त्यातून समाजामध्ये देखील खूप मोठ्या प्रमाणात दु:खाची लाट तयार झाली. आपण एसआयटी नेमली. न्यायिक समितीमार्फत चौकशी सुरु आहे. तीन मुद्दे सन्मानीय सदस्यांनी उपस्थित केले. आतापर्यंतच्या तपासात फॉरेन्सिक रिपोर्ट आलेला आहे. त्या रिपोर्टनुसार डॉक्टर महिलेने जे काही तिच्या हातावर लिहिलेलं आहे, ती हँडरायटिंग तिचीच आहे

**फलटण महिला डॉक्टर मृत्यू प्रकरणात आतापर्यंत जो तपास झालाय, त्या बाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात महत्वाची माहिती दिली. पोलीस अधिकारी बदनेने महिला डॉक्टरचं शोषण केल्याच तपासातून स्पष्ट झालय. त्या शिवाय या प्रकरणात अजून काही गंभीर आरोप झाले आहेत, त्या बाबत मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला माहिती दिली.**

अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात दिली. दुसरा विषय मांडला की, या प्रकरणात आरोपी आहेत, त्या आरोपींनी दबाव आणला का? मूळामध्ये या केसमध्ये हे जे पोलीस अधिकारी बदने आहेत, या बदनेने एकप्रकारे जी काही माहिती आली, चॅट आलेले आहेत, त्या सगळ्यामध्ये बदनेने तिची फसवणूक करुन तिचं शारीरिक शोषण केलं अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली.

बदनेने हे सर्व केल्याचं तपासातून निष्पन्न होतय. त्यातून मग लग्नाचं आमिष दाखवणं अशा गोष्टी आलेल्या आहेत. नंतर मात्र वेगळी भूमिका बदनेने घेतलेली दिसते. तिच शोषण केल्याचं लक्षात येतं असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. ती मेडीकल ऑफिसर होती, ज्या आरोपीला अटक होते ▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या मतदार यादीच्या तारखा बदलल्या, नवीन वेळापत्रक जाहीर




**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र निवडणूक आयोगाने (एसईसी) २९ महानगरपालिकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. अंतिम यादी आता १५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल.

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने (एसईसी) मंगळवारी राज्यातील २९ महानगरपालिकांच्या आगामी निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी सुधारित वेळापत्रक जाहीर केले. तथापि, आयोगाने अद्याप या महानगरपालिका संस्थांमध्ये निवडणुका घेण्याच्या तारखा जाहीर केलेल्या नाहीत.

तीन महत्त्वाच्या तारखांमध्ये बदल- महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने २९ महानगरपालिकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी सुधारित वेळापत्रक अधिकृतपणे जाहीर केले आहे . हा बदल प्रामुख्याने पूर्वी प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार करून करण्यात आला आहे. आयोगाने जाहीर केलेल्या नवीन वेळापत्रकानुसार, मतदार यादी प्रकाशनाशी संबंधित तीन प्रमुख मुदती सुधारित करण्यात आल्या आहेत.

१ प्रभागनिहाय अंतिम यादी प्रसिद्ध करणे- मतदान प्रक्रियेसाठी अंतिम प्रभागनिहाय यादीची पडताळणी आणि प्रकाशन करण्याची तारीख बदलण्यात आली आहे. हे काम पूर्वी १० डिसेंबर रोजी पूर्ण करण्याचे नियोजन होते. सुधारित वेळापत्रकानुसार, अंतिम प्रभागनिहाय यादीचे ▶ उर्वरित पान २ वर

## बीड पालिकेत कहर, सफाई कामगाराचा अधिकाऱ्या सारखा रुबाब; लाच घेताना ACB कडून अटक



**बीड । प्रतिनिधी**

नगर पालिका निवडणुकीच्या धामधुमीतच बीड नगर पालिका पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मागील महिन्यातच अविनाश धांडे नामक कर्मचाऱ्याने वरिष्ठ आणि सहकारी कर्मचाऱ्यांची नावे लिहून पालिकेच्या छतावर आत्महत्या केली होती. या घटनेची चौकशी सुरू असतानाच, आता मंगळवारी पालिकेतील एका सफाई कामगाराला एक हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे.

तक्रारदार यांनी एका महिन्यापूर्वी प्लॉट विक्रीसाठी अर्ज केला होता. त्यांना त्यांच्या प्लॉटची गुंठेवारीची प्रत खरी आहे की खोटी, हे पालिका अभिलेखे विभागाने ठरवून देणे आवश्यक होते. यासाठी तक्रारदारांनी रितसर शुल्क पालिकेत भरले होते. परंतु, अभिलेखे विभागात कार्यरत असलेल्या आशिष मस्के या सफाई कामगाराने हे काम करून देण्यासाठी तक्रारदाराकडे एक हजार रुपयांची लाच मागितली. एवढेच नव्हे तर, त्याने तक्रारदारांशी उद्धट वर्तनही केले होते. या त्रासाला कंटाळून तक्रारदारांनी बीडच्या एसीबीकडे तक्रार नोंदवली. एसीबीच्या पथकाने मंगळवारी दुपारी बीड पालिकेच्या आवारातच सापळा लावला. आशिष मस्के याने पैसे स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला तातडीने ताब्यात घेतले. एका कर्मचाऱ्याच्या आत्महत्येमुळे पालिका ▶ उर्वरित पान २ वर

## '...तर महाराष्ट्र बंद', संतोष देशमुख हत्या प्रकरणासंबंधी घडामोडीवर मनोज जरांगेंचा सरकारला थेट इशारा



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग गावचे तत्कालीन सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांच्या हत्येला एक वर्ष पूर्ण होत असताना, या पार्श्वभूमीवर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. या वेळी त्यांनी राज्य सरकारवर आणि विशेषतः नाव न घेता अजित पवार गटाचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर घेता टीका केली. जरांगे पाटील यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी एक वर्षाच्या आत आरोपींना फाशी दिली जाईल असे आश्वासन दिले होते, मात्र आता या तपासात विलंब होत असून प्रकरण मुद्दाम लांबवले जात असल्याची शंका निर्माण होत आहे.

त्यांनी स्पष्ट केले की संतोष देशमुख यांच्या लहान मुलांना आज वडील दिसत नाहीत, त्यामुळे आरोपींना कठोर शिक्षा होईपर्यंत समाधान मिळणार नाही. काही लोकांना आरोपी सुटणार आहे अशा अफवा पसरवण्यास सांगितले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी परळीकर हा शब्दप्रयोग केला आहे.

जरांगे पाटील यांनी इशारा दिला की, ज्या दिवशी या प्रकरणातील आरोपीला मुक्त केले जाईल, त्या दिवशी जिल्हा बंद करण्यात येईल आणि त्यानंतर राज्यही बंद करण्याची वेळ येईल. जरांगेंनी सरकारला प्रश्न केला की, काहीजण अशा प्रकारे वातावरण निर्मिती करतात आणि सरकारला अडचणीत टाकण्याचे वक्तव्य का करतात, हे शोधण्याची गरज आहे.

आरोपी सुटणार नाही, हे सत्य आहे, असे ते म्हणाले. तसेच, हा सगळा प्रकार काही व्यक्तींनी आखून आणल्याचा त्यांनी दावा केला आहे. ▶ उर्वरित पान २ वर

## नोकरी मिळणार या आशेने लग्न केलं; सत्य समोर येताच... महिला कबड्डीपटूने विष प्राशन करून केली आत्महत्या



**नागपूर । प्रतिनिधी**

उपराजधानी नागपूरमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. नोकरीच्या आमिषाने लग्न करून फसवणूक केल्यामुळे एका महिला कबड्डीपटूने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील माळेगाव टाऊन येथील किरण दाढे या महिला कबड्डीपटूने विष प्राशन करून आत्महत्या केली आहे. आर्थिक अडचणी, शिक्षण खर्च आणि नोकरीसाठी पतीकडून येणाऱ्या दबावाला कंटाळून या महिलेने कीटक नाशक औषध प्राशन करत आपले जीवन संपवलं आहे. या घटनेमुळे नागपूरमध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत समोर आलेल्या माहितीनुसार, महिला कबड्डीपटू किरण दाढेने स्वप्नील जयदेव लांबघरेसोबत २०२० मध्ये लग्न केले होते. लग्नापूर्वी किरण आणि तिच्या भावाला नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी नोकरीचा फायदा होईल या आशेने किरण यांनी लग्नाला सहमती दिली होती. मात्र काही काळानंतर आपली फसवणूक झाली असल्याचे किरणच्या लक्षात आले.

लग्नानंतर स्वप्नील नोकरी देण्यास उशीर करत राहिला. त्याने तिचा मानसिक आणि लैंगिक छळ करण्यास सुरुवात केली. त्यामुळे किरण तिच्या पालकांच्या घरी रहायला आली. त्यानंतर तिला धमक्या देण्यात आल्या तसेच शिवीगाळ देखील करण्यात आली. त्यानंतर स्वप्नीलने कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला ▶ उर्वरित पान २ वर

## इमीटेशन ज्वेलरी चोरी प्रकरणात पोलीसांनी काही तासातच चोऱ्याच्या आवळल्या मुसक्या



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील कोहिनूर जनरल स्टोअर्स येथे सोमवारी (दि.८) दिवसाढवळ्या चोरीची घटना घडली होती. याची बीड शहर पोलिसांना माहिती देताच तपासाची चक्रे फिरवून एका आरोपीच्या मुसक्या आवळण्यात यश आले असून, त्याच्याकडून ४० हजाराचे इमीटेशन ज्वेलरी आणि रिक्षा असा एकूण २ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन संशयित आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. ▶ उर्वरित पान २ वर

## शैक्षणिक सहलींसाठी बीड जिल्ह्यासाठी ४४ बसेस राखीव

**बी । प्रतिनिधी**

पर्यटनाची आवड वाढवणे, महाराष्ट्रातील गडकोट व देवस्थाने सर्वसामान्यांच्या अल्पदरात सुरू केली आवाक्यात आणणे आणि प्रवाशांना सुरक्षित-सुलभ प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने सामूहिक पर्यटनासाठी विशेष बससेवा सुरू केली आहे. 'लालपरी' आता पर्यटन पर्यटनाची नवी दिशा ठरू लागली असून आगारातही ही सेवा अधिकृतपणे



सुरू करण्यात आली आहे. या नव्या सुविधेमुळे धार्मिक स्थळे, ऐतिहासिक गडकिल्ले आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना एकाच वेळी, एकाच तिकीटात आणि सवलतीच्या दरात उत्कृष्ट प्रवासाचा लाभ मिळणार आहे. महिलांना ५० टक्के सवलत आणि ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत योजने'चा लाभ ही सुविधा इतर नियमित बसप्रमाणेच स्वतंत्र बससेवा उपलब्ध केली आहे. सर्व प्रवास सामूहिक असल्यास मागणीनुसार बसेस तत्काळ उपलब्ध करून देण्याची सोय करण्यात आली असून सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी आवश्यक ▶ उर्वरित पान २ वर

## जमिनीच्या किरकोळ वादातून महिलेसह तिच्या मुंलाला बेदम मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

जमिनीच्या किरकोळ वादातून एका महिलेसह तिच्या मुलाला बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार बीडच्या केज तालुक्यातील सांगवी गावात उघडकीस आला आहे. गावगुंडांनी संबंधित महिलेला आणि तिच्या मुलाला भर रस्त्यात अमानुष मारहाण केली. या दुर्घटनेत महिला गंभीर जखमी झाली आहे. गंभीर जखमी महिलेवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.अमानुष मारण्याचा व्हीडीओ मोबाईल कॅमे-यात कैद झाला असून मारहाण करणा-यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी महिलेच्या कुटुंबाने केली आहे.बीड जिल्ह्यातील केज येथे एका महिलेला आणि तिच्या मुलाला भर रस्त्यात बेदम मारहाण करण्यात आली. जमिनीच्या वादातून ही मारहाण करण्यात आली असून याआधी या गावगुंडांच्या विरोधात पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली होती. मात्र तक्रार का नोंदवली म्हणत गावगुंडांनी महिलेची व तिच्या मुलाची रस्त्यात वाट अडवत मारहाण केली. अशी माहिती मिळाली आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्याचे काम सुरू आहे

## आधी देवदर्शनाला गेले, किरकोळ वादानंतर संपवलं जीवन; कला केंद्रातील नर्तिकेसाठी युवकाचं टोकाचं पाऊल




**धाराशिव । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी आणि बीड जिल्ह्यातील गेवराई येथे नर्तिकेच्या नादातून युवकाने आपलं जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली होती. त्यानंतर, आता धाराशिवमध्ये कला केंद्रातील महिलेसोबत प्रेमसंबंधातून वाद झाल्याने तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

अश्रुबा कांबळे असं मृत युवकाचं नाव असून दोघेही एकत्रितपणे देवदर्शनासाठी गेले होते, तिथून आल्यानंतरच किरकोळ वाद दोघांमध्ये झाला. त्यातूनच, तरुणाने हे टोकाचं पाऊल उचलल्याची माहिती आहे. दरम्यान, यापूर्वी वैरागच्यासासुरे येथेही बीडमधील एका युवकाने नर्तिकेच्या नादात स्वत:चं जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली होती.

धाराशिवमधील साई कला केंद्रमध्ये नृत्य काम करणाऱ्या महिलेचा तिच्या प्रियकरासोबत वाद झाला. त्यामध्ये, प्रियकराने आत्महत्या करण्याची धमकी दिली होती, धक्कादायक बाब म्हणजे या धमकीनंतर काही वेळातच प्रियकराने गळफास घेऊन आत्महत्या केली. अश्रुबा अंकुश कांबळे (वय वर्ष २५) या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. ▶ उर्वरित पान २ वर



# १० डिसेंबर : आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन : मानवतेच्या प्रतिष्ठेची, स्वातंत्र्याची आणि न्यायाची न संपणारी ज्योत

मानवजातीचा सर्वात मोठा शोध कोणता ? शास्त्र म्हणतं – अग्नी . इतिहास म्हणतो – चाक . राजकारण म्हणतं – राज्यव्यवस्था . पण मानवता एकच उत्तर देते – अधिकार . माणूस माणूस म्हणून जगू शकतो याची पहिली अट म्हणजे त्याचे मूलभूत अधिकार सुरक्षित असणे . म्हणूनच प्रत्येक वर्षी १० डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन म्हणून साजरा केला जातो . हा दिवस केवळ स्मरणाचा नाही , तर चेतनेचा , विवेकाचा आणि परिवर्तनाच्या दिशेने चालण्याचा आहे . हा दिवस जगाला सांगतो – स्वातंत्र्य हे कृपा नसते ; ते हक्क असते . न्याय हा दान नाही ; तो अधिकार असतो . आणि समानता ही उपकाराची गोष्ट नाही ; ती मानवी जन्मसिद्ध प्रतिष्ठा आहे .

मानवाधिकारांची सुरुवात : जगाला बदलणारा दस्तऐवज दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने अत्याचारांचे भयावह स्वरूप पाहिले . लाखो लोकांचा मृत्यू , अमानवी छळ , यातना आणि वंशहत्येच्या काळोखाने मानवजातीचे अंतर्मन हलले . यानंतर १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने मानवाधिकार सार्वत्रिक घोषणापत्र स्वीकारले . ३० कलमांचे हे घोषणापत्र म्हणजे मानवी संस्कृतीचे उज्ज्वल शिलालेख . जन्मतः स्वातंत्र्य , अभिव्यक्ती स्वातंत्र्य , जीवनाचा हक्क , न्याय मिळण्याचा अधिकार , शिक्षणाचा हक्क , सुरक्षित अस्तित्व – या सर्व अधिकारांनी जगाचा विचार बदलला . भारत आणि मानवाधिकार : संविधानाचा आत्मा भारताचे संविधान हे जगातील सर्वात प्रगत व मानवी मूल्यांनी अधोरेखित दस्तऐवजांपैकी एक आहे . स्वातंत्र्य , समता , बंधुता आणि न्याय – ही चार मूल्ये संविधानाची पायाभरणी आहेत . ही मूल्ये कागदावर नाहीत ; ती भारतीय लोकशाहीची जीवनवाहिनी आहेत.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या मूल्यांना संविधानरूपी शाश्वत स्वरूप दिले . मूलभूत अधिकार – समानतेचा हक्क , अभिव्यक्ती स्वातंत्र्य , शोषणाविरुद्ध संरक्षण , धर्मस्वातंत्र्य , शिक्षणाचा हक्क – हे सर्व आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेचे मजबूत कणा आहेत . मानवाधिकार दिनाची आजची गरज जग बदलले , तंत्रज्ञान वेगाने पुढे गेले , समाज शिक्षित झाला , तरीही मानवतेसमोरील संकटे संपलेली नाहीत . जातिभेद , लिंगभेद , दारिद्र्य , बालमजुरी , मानवी तस्करी , मानसिक आरोग्याच्या समस्या , युद्धे , निर्वासितांची करुण कहाणी – ही आजच्या मानवजातीची नवी आव्हाने आहेत . म्हणून मानवाधिकार दिन सांगतो – मानवता अजून जिंकलेली नाही . लढाई अजून संपलेली नाही.

महिला आणि मानवाधिकार : सन्मानाची शाश्वत लढाई – महिला सक्षमीकरण हा मानवाधिकारांचा मूलस्तंभ आहे . समाजातील प्रगती असूनही घरगुती हिंसा , छेडछाड , कार्यस्थळी असमानता , मुलींच्या शिक्षणातील अडथळे – ही समस्या आजही कायम आहेत . स्त्रीचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान – या तत्त्वाची आजही नव्याने जाणीव करून देण्याची गरज आहे . ग्रामीण स्त्रिया : मानवाधिकारांचा न बोलेला अध्याय मातीचा वास , ओंबळीचा धूर , शेताची कुस , डोईवरच घमेल – ग्रामीण भारतात स्त्री हीच घराची धुरा आणि शेताची श्वास आहे . परंतु तिच्या कष्टांना अद्याप योग्य हक्क आणि मान्यता मिळालेली नाही . पाणी आणण्यापासून शेतीमधील श्रमापर्यंत घराची जबाबदारी ते मुलांच्या संगोपनापर्यंत – प्रत्येक भूमिका ती न आवाज करता निभावते . पण निर्णय प्रक्रियेत तिचा आवाज क्वचितच ऐकू येतो .

मानवाधिकार दिन सांगतो – ज्यांच्यावर घर उभं आहे त्यांच्या हक्कांचीदेखील भक्कम पायाभरणी व्हायला हवी . ग्रामीण स्त्री म्हणजे मातीची मूर्ती – कठोर , सहनशील आणि तुटूनही पुन्हा घडणारी . तिच्या शिक्षणाचा हक्क , आरोग्याचा हक्क , सुरक्षिततेचा हक्क आणि सन्मानाने जगण्याचा हक्क – हे मानवाधिकारांचे मूलस्वर आहेत.

बालकांचे अधिकार : भविष्यातील मानवतेचे संरक्षण बालपण हा मानवतेचा सर्वात कोमल आणि महत्त्वाचा टप्पा आहे . परंतु अजूनही शिक्षण , आरोग्य , सुरक्षितता या मूलभूत गोष्टी अनेक मुलांना उपलब्ध नाहीत . बालमजुरी आणि अत्याचारांच्या घटना चिंता वाढवतात . बाल हक्क म्हणजे मानवतेचे भविष्य सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी – ही ओळ बालहक्कांचे महत्त्व स्पष्ट करते.

मानसिक आरोग्य : न दिसणारा पण गंभीर मानवाधिकार मुद्दा मानसिक आरोग्य हे शरीराइतकेच महत्त्वाचे आहे . नैराश्य , ताण , चिंता , व्यसन , सामाजिक एकाकीपणा – या समस्या वाढत आहेत . मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे हे आधुनिक मानवाधिकारांचे केंद्र आहे . भारत , महाराष्ट्र आणि मानवाधिकार चळवळी महाराष्ट्राला सामाजिक न्यायाचा समृद्ध वारसा लाभला आहे . फुले , सावित्रीबाई , शाहू महाराज , बाबासाहेब – यांनी मानवाधिकारांची पायाभरणी केली . आज राज्य शासन संविधान जनजागृती , महिला सुरक्षा , बालसुरक्षा , दिव्यांग अधिकार , पर्यावरण संरक्षण – अशा अनेक उपक्रमांतून मानवतेचा संदेश पोहोचवत आहे .

मानवाधिकार आणि डिजिटल युग : नवे स्वातंत्र्य , नवे धोके ए आय , सोशल मीडिया , निगराणी तंत्रज्ञान , डेटाचा गैरवापर – या सर्वांनी डिजिटल मानवाधिकारांचा विषय अधिक गंभीर केला आहे . गोपनीयता , माहिती सुरक्षा , वैयक्तिक स्वातंत्र्य यांचे रक्षण आज अत्यंत आवश्यक आहे .

समाजाची भूमिका : हक्क जपायचे असतात मानवाधिकार दिन हा नुसत्या घोषणांचा दिवस नाही ; तो कृतीचा दिवस आहे . प्रत्येक नागरिकाने भेदभावाला नकार देणे , दुर्बलांच्या बाजूने आवाज उठवणे , सत्याचा शोध घेणे , संविधानाचा आदर करणे – हे आचरणात आणणे गरजेचे आहे . जेव्हा तू अन्याय पाहून शांत राहतोस , तेव्हा तूही त्या अन्यायाचा भाग बनतोस – ही चेतावणी आजही तितकीच लागू आहे .

मानवता : मानवतेचा दिवा ; माणूस नावाचा दिवा मातीचा नसतो ; मनाचा असतो . मानवतेच्या श्वासात जळणारी जिवंत ठिणगी आहे ती . जात नाही , धर्म नाही , वर्ग नाही – माणूस हीच खरी ओळख . हक्क जपले तरच जग सुंदर ; अन्यथा भविष्य धुरकट होतं . मानवाधिकार म्हणजे मानवतेचे हृदय मानवाधिकार दिन सांगतो – माणूस महान त्याच्या जन्माने नाही ; त्याच्या विचारांनी होतो . मानवतेची मोजणी सत्ता , पैसा , पद यांनी होत नाही ; तर संवेदना , न्याय आणि माणुसकी यांनी होते . जग बदलण्यासाठी मोठ्या क्रांत्या लागत नाहीत ; माणूस माणसासारखा वागला , तरी पुरेसं आहे.



**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

◆ पान १ वरून पुढे...

## 'बदनेकडून महिला....

तो अटकेकरता फिट आहे का? याबाबत रिपोर्ट घ्यावा लागतो असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.
अनफिटचं प्रमाणपत्र दिलं जातय– अशा प्रकारचे काही रिपोर्ट्स हे त्या महिला डॉक्टरने अनफिट म्हणून दिले. म्हणून पोलिसांनी एक मोठं पत्र हे त्यावेळी त्यांचे वरिष्ठ आहेत त्यांना लिहिलेलं. महत्वाच्या गुन्ह्यांमधील गुन्हेगारांना अनफिटचं प्रमाणपत्र दिलं जातय. मग त्यावर चौकशी झाली. तिने सुद्धा पत्र दिलं. हे सगळं पाचमहिने आधीच आहे असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.
हातावर लिहिलेलं अक्षर त्या महिलेचचं– आत्महत्या प्रकरणामध्ये मात्र बदनेने केलेली फसवणूक आहे. त्या परिस्थितीचा फायदा उचलून दुसऱ्या आरोपीने तिची फसवणूक केली. त्या दोघांची नावं लिहून तिने आत्महत्या केली. आतापर्यंतचे जे रिपोर्ट्स आहेत, फॉरेन्सिक रिपोर्ट आहेत, त्यानुसार गळफास लावून झालेला मृत्यू आहे. हातावर लिहिलेलं अक्षर त्या महिलेचं आहे. तपासातून समोर आलय. तपास अजून संपलेला नाही. आरोपपत्र दाखल होईल. अनेक गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. त्याची स्वतंत्रपणे चौकशी करण्यासाठी न्यायाधीशाची नेमणूक केली आहे. पोलीस तपास हा महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या माध्यमातून चालला आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला सांगितलं.

## महाराष्ट्रातील २९...

प्रकाशन आता १० डिसेंबरवरून१५ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आले आहे.
२. मतदान केंद्र यादीचे प्रकाशन– मतदान केंद्रांची यादी प्रकाशित करण्याची अंतिम तारीख देखील सुधारित करण्यात आली आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, मतदान केंद्रांची यादी प्रकाशित करण्याची अंतिम तारीख मूळतः १५ डिसेंबर होती. ती आता २० डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. ३. मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे– मतदान प्रक्रियेच्या या अंतिम टप्प्याची तारीखही बदलण्यात आली आहे. मतदान केंद्रानुसार मतदार याद्या प्रसिद्ध करण्याची अंतिम तारीख २२ डिसेंबरवरून २७ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. मतदार याद्या तयार करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने महापालिका अधिकाऱ्यांनाही विशिष्ट सूचना जारी केल्या आहेत. मतदार यादी तयार करताना काही तांत्रिक समस्या उद्भवल्यास, महापालिका अधिकारी त्यांच्या संबंधित संगणकीकरण कक्षाशी ईमेल किंवा फोनद्वारे संपर्क साधू शकतात, असे निर्देश एसईसीने दिले आहेत. अधिकाऱ्याने स्पष्ट केले की हा कार्यक्रम २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांना लागू होतो, ज्यांच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत.

## बीड पालिकेत...

आधीच चौकशीच्या फेऱ्यात असताना, लगेच दुसऱ्या महिन्यात लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आल्याने पालिका प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. एसीबीची ही कारवाई पोलिस उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली. आशिषचे पद कामगार, पण रूबाब अधिकाऱ्याचा आशिष हा सफाई कामगार आहे. त्याने शहरात फिरून नियमित स्वच्छता करणे अपेक्षित आहे. परंतू त्याचा रूबाब अधिकाऱ्यांपेक्षा कमी नव्हता. त्याने स्वच्छता तर कधी केलीच नाही, परंतू अभिलेखे कक्षात राहून सामान्यांची कामे अडविणे, त्यांच्याकडून पैसे घेणे, असे प्रकार केल्याचे सांगण्यात आले. आता या विभागाचे प्रमुख आणि स्वाक्षरी करणारे अधिकारीही अडचणीत आले आहेत. आगोदरच या अधिकाऱ्यांची धांडे आत्महत्या प्रकरणात चौकशी सुरू आहे.

## '...तर महाराष्ट्र....

जरांगे पाटील म्हणाले की, तपास सुरुवातीला वेगाने सुरू होता कारण त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द महत्त्वाचा होता आणि नागरिक शांत राहिले होते. आता त्यात गती मंदावली असल्याचे दिसत आहे असंही त्यांनी सांगितले आहे. त्यांनी यावेळी क्रूर कृत्य करणारे आरोपी बाहेर फिरत आहेत आणि कृष्णा आंधळे अद्याप सापडत नसल्याची खंतही व्यक्त केली. हत्या करताना आंधळे व्हिडिओ कॉलवर होता, तो पकडला तर मोठा उलगडा होईल, असे त्यांनी नमूद केले. राज्य विधानसभेच्या अधिवेशनातही या प्रकरणाचा उल्लेख झाल्याचे सांगत त्यांनी सरकारने या केसचा निकाल चार ते पाच महिन्यांत निघावा अशी मागणी केली. अशा लोकांना संरक्षण दिले तर आम्हाला अजित पवारांवर राग येणारच. चुकीच्या व्यक्तीला जवळ करण्याचे पाप करू नका, अशी टीका त्यांनी केली.

## नोकरी मिळणार...

होता. मात्र फसवणूक झाल्याने किरण नैराश्यात गेली होती. त्यामुळे तिने विष प्राशन करून जीवन संपवण्याचा निर्णय घेतला.
पती विरोधात गुन्हा दाखल– आत्महत्या करण्यासाठी किरणने कीटक नाशक पिले. कुंटुंबाच्या ही बाब लक्षात आली असता त्यांनी तिला उपचारासाठी रुग्णालयात नेले, मात्र तिचा मृत्यू झाला. किरणच्या आत्महत्येने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. किरणच्या माहेरच्यांनी स्वप्नीलवर नोकरी मिळवून देण्याचे खोटे आश्वासन देऊन लग्न केल्याचा गंभीर आरोप केला आहे. पतीकडून होत असलेल्या मानसिक त्रासामुळे किरण तणावात होती असा आरोपही त्यांनी केला आहे. तसेच नोकरी, संसार व तणावाच्या दबावामुळे तिने जीवन संपवल्याचे बोलले जात आहे. आता याप्रकरणी पतीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीसांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला आहे.

## इमीटेशन ज्वेलरी...

काही तासातच चोरीचा तपास लावून आरोपी दिलशान खान यास जेरबंद केल्याने शहर पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे. औरंगाबाद पडेगाव येथील रहिवासी रिक्षा चालक आणि त्याचे दोन साथीदार त्यात एक महिला हे तिघे बीड येथे येऊन दुकानात गर्दी पाहून त्या दुकानात घुसून व दुकानदार, सेल्समन यांची नजर चुकवून चोरी करीत असे. सोमवारी दि. ८ या तिघांनी शहरातील कोहिनूर जनरल स्टोअर्स, बीड येथे इमिटेशन ज्वेलरीची चोरी केली. दुकानदाराच्या लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे धाव घेऊन चोरीची माहिती बीड शहर पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. गोपनीय माहितीनुसार चोरीमध्ये सहभागी असलेल्या रिक्षा चालकास चोरीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात यश आले. त्याकडून ४० हजार रुपये किमतीचे इमिटेशन ज्वेलरी तसेच अंदाजे २.५ लाख रुपये किमतीची रिक्षा असा एकूण २ लाख ९० हजार चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हे चोरटे बीड शहरात चोरी करुन रिक्षाने औरंगाबाद पेडगाव येथे पळून जात होते. एका आरोपीला पोलिसांनी अटक केली असून दोन संशयित आरोपींचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार बबन जाधव, शहेनशहा सय्यद, इलियास शेख, मंगेश शिंदे, रामेश्वर पवार आणि गहिनीनाथ बावनकर ,गोवर्धन सोनवणे यांनी केली आहे.

## शैक्षणिक सहलींसाठी...

त्या सर्व पर्यटन बसमध्येही लागू असेल. राज्य परिवहन महामंडळाने ११ विशेष पर्यटन टप्प्यांची आखणी केली असून यात पंढरपूर–पन्हाळा – ज्योतिबा–कोल्हापूर–गणपतीपुळे, महाराष्ट्रातील पाच ज्योतिर्लिंग, साडेतीन शक्तीपीठे, अष्टविनायक, तुळजापूर –अक्कलकोट –पंढरपुर पंढरपूर– – नरसोबाची वाडी, शनिशिंगणापूर – शिर्डी, वेरूळ अजिंठा– राजूर – गणपती दर्शन, देऊळगाव राजा – लोणार सरोवर –शेगाव गजानन महाराज मंदिर अशा महत्त्वपूर्ण धार्मिक यात्रेचा समावेश आहे. 'बीड विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यासाठी तब्बल ४४ बसेस पर्यटन सेवेसाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. मागणीप्रमाणे या सर्व बसेस सर्वसामान्य दरात पर्यटनासाठी तत्पर राहतील. सुविधा लागू राहणार आहेत.

## आधी देवदर्शनाला....

अश्रुबा कांबळे रुईढोकीगावचारहिवाशी आहे, गेल्या ५ वर्षापासून कला केंद्रातील नर्तिका आणि त्याच्यात अनैतिक प्रेम संबंध असल्याची माहिती समोर आली असून मृत तरुण आणि तरुणी शिखर शिंगणापूर येथे काल देवदर्शनाला गेले, देवदर्शन करून परतत असताना दोघांमध्ये वाद झाला.
देव दर्शनावरुन परत येत असताना मृत प्रियकराच्या बायकोचा फोन आला म्हणून नर्तिका आणि अश्रुबा यांच्या वाद झाला होता. त्यानंतर, मी आत्महत्या करतो म्हणून धमकी देत तो निघून गेला. मात्र, प्रियसीनेअश्रुबाच्या या धमकीडे दुर्लक्ष करत गांभीर्याने विचार केला नाही. तर, अश्रुबानेगळफास घेऊन आत्महत्या केल्याची उघडकीस आले. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा व पोस्टमार्टम करून त्यांनी मृत व्यक्तीचे प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी, येरमाळापोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू, मात्र या घटनेने धाराशिव जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. आरोपी महिलेलाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून महिलेने त्रास दिला का याचाही तपास पोलीस करत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## भरारी पथकाने....

असता त्यांच्या कडे बिल नसले बाबत सांगितले. त्यानंतर संबंधित उत्पादक शिवाजी अ‍ॅग्रो क्रॉप जालनाचे प्रतिनिधी भागीरथी के. यांना भ्रमणध्वनीद्वारे विचारणा केली असता. त्यांनी सांगितले की शिवाजी अ‍ॅग्रो क्रॉप सायन्स जालना चा परवाना करार रदद करनेबाबत दि.४/०२/२०२५ रोजी मा. कृषि संचालक (नि.गुनि.)यांना प्रस्ताव सादर केला आहे. त्यानंतर कंपनीने कोणत्याही प्रकारचे उत्पादन व पुरवठा केला नाही. याबाबत वितरक कंपनीचे संचालक निखिल कासोळे यांना भ्रमणध्वनीद्वारे कृषि केंद्र चालक प्रतिनिधी राधेशाम काकडे यांनी विक्री केंद्रात बोलावून घेतले. निखिल कासोळे यांना सदरील खत कृषि गौरव फर्टिलायझर ता.नेवासा,जि.अहमदनगर यांचेकडून सिलीकॉन खत या नावाने खरेदी करून ते खत १०:२०:२० व २०:२०:०० या खताच्या बॅग भरून मे. काव्या अ‍ॅग्रो गेवराई यांना दुकानदारास दिले याबाबत लेखी खुलासा दिला. यानिमित्ताने जिल्ह्यात कुठेही विना परवाना, अनधिकृत कृषी निविष्ठा विक्री होत असल्यास जवळच्या कृषी कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

## तलवाडा येथील...

सुरवात करण्याची मागणी केलेली आहे नसता रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल आसा इशारा संबंधित प्रशासनाला दिला आहे. निवेदनात म्हण्टले आहे की छत्रपती शिवाजी महाराज चौक तलवाड़ा ते गंगाचाडी फाटा या दरम्यान चा नवीन रस्ता मंजूर होऊन तब्बल दोन वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. याच रस्त्याला जोडून गोविंदवाडी पर्यंत रस्ता असल्याने या रस्त्याचे चाळीस टक्के बिल गुत्तेदाराने उचलून घेतले असल्याचे समजत असून यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याऱ्यांनी लक्ष देऊन पाहणी केली की नाही? या कामावर देखरेख करत असलेले अभियंता यानी डोळेझाक केली का? असे अनेक प्रश्न तलवाडा आणि या रस्त्यावरील रहदारी करणाऱ्या नागरिक कडून उपस्थित होत असून सदर रस्त्याचे काम तात्कांळ सुरू न केल्यास दिनाक १३/१२/२०२५ वार शनिवार रोजी सकाळी १०:३० वाजता, तलवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक गेवराई तलवाडा रस्त्यावर स्वाभिमानी शेतकरी संघटना व तलवाडा आणि तलवाडा परिसरातील नागरिकाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी आसे निवेदनाच्या शेवटी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व त्यांच्या सर्व सहका–यांनी म्हण्टले आहे.

## शौचालय वापरात...

केंद्राखालील कोंबडं वस्ती जिल्हा परिषद शाळेतील शौचालय अनेक वर्षांपासून बंद असून पूर्णपणे निकामी आहेत. परिणामी, विद्यार्थ्यांना शौचालयासाठी सरांची परवानगी घेऊन घरी जावे लागते, अशी व्यथा विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना व्यक्त केली. अभियानाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे १० डिसेंबरला 'उत्तम शौचालय पुरस्कार' जाहीर होणार असल्याचे प्रशासन सांगत असताना अस्तित्वात नसलेल्या सुविधांची चमकदार कागदी नोंद मात्र व्यवस्थित तयार आहे. यावर टीका करत डॉ. ढवळे म्हणाले कागदोपत्रीच अभियान राबवल्याबद्दल सर्वात उत्कृष्ट पुरस्कार तर सीईओ जितीन रहमान यांच्याच गळ्यात टाका! महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी आणि शाळेचे शिक्षक रोहन मुंडे यांना या विशेष मोहिमेबाबत विचारले असता, अभियान सुरू असल्याची कोणतीही सूचना किंवा पत्र आम्हाला प्रशासनाकडून मिळालेच नाही, असे त्यांनी स्पष्ट सांगितले.
विद्यार्थ्यांची वास्तविक वेदना– * शाळेचे शौचालय वापरातच नाही. त्यामुळे सरांना सांगून घरी जावे लागते. (सई रामचंद्र घरत – इयत्ता ४ थी), * माझं घर लांब आहे म्हणून मी मित्र विराज घरतच्या घरी जातो.(चैतन्य चांगदेव घरत – विद्यार्थी)
इतक्या मूलभूत सुविधेसाठी विद्यार्थ्यांना भटकंती करावी लागत आहे, ही अत्यंत उद्विग्न करणारी बाब आहे.

## बीड जिल्हा...

आहे. लाभार्थी निवड
लक्षांकाच्या अधीन राहून प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (ऋउऋ्ड) या तत्त्वावर करण्यात येणार आहे. त्यामुळे या घटकासाठी जास्तीत जास्त इच्छुक शेतकरी बांधवांनी अर्ज करावेत आणि लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

## लिंबागणेश परिसरात...

हल्ल्यात पूर्वीही शेतकरी व ग्रामस्थ मृत्युमुखी पडल्याच्या घटना झाल्या असल्याने या परिस्थितीकडे दुर्लक्ष धोकादायक ठरू शकते.
लिंबागणेश, पिंपरनई, पोखरी, बेलगाव, सोमनाथवाडी, मसेवाडी, मोरगाव, फुकेवाडी, काळेवाडी व गणेशनगर या भागांमध्ये रात्रीचा विद्युतपुरवठा थांबवून दिवसा नियमित व पुरेसा पुरवठा द्यावा, अशी ठाम मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## बीड जिल्ह्यात...

आहे. परिणामी, अनेक गावांमध्ये पाईप टाकून कामे अधांतरीच ठेवली गेली. नवीन निधी द्यायचा की नाही याबाबत केंद्र सरकारने ठाम भूमिका घेतली असून पुढील वाटचाल लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांवर अवलंबून राहणार आहे. केंद्रीय जलमंत्रालयाने नियुक्त केलेली तीन सदस्यीय लेखापरीक्षण समिती बीडमध्ये दाखल झाली असून ती आठवडाभर जिल्ह्यात फिरून खर्चाच्या नोंदी, प्रत्यक्ष कामांची सद्यस्थिती, प्रायोगिक तत्त्वावर निवडक योजनेची पाहणी करणार आहे. या टीमसोबत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, वित्त व लेखा विभागातील अधिकारी तसेच जलजीवन प्राधिकरणाचे लेखाधिकारी उपस्थित राहणार आहेत. गावोगावातील तक्रारी, निष्क्रिय योजना, अडलेला पाणीपुरवठा आणि निधीचा प्रचंड गैरव्यवहार या सर्व आरोपांची पडताळणी करून समितीचा अहवाल थेट केंद्रीय जलमंत्रालयांकडे जाणार आहे. विश्वासार्ह सूत्रांच्या मते, जर भ्रष्टाचार सिद्ध झाला, तर पुढील निधी रोखण्याचा निर्णय मंत्रालय घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही. जलजीवन मिशनसारख्या महत्त्वाकांक्षी योजनेच्या १८९२ कोटी रुपयांवर 'कुणाचा हात' ? कामे न झाल्याचे दोषी कोण? आणि गावकऱ्यांना पाणी कधी मिळणार? हे सर्व प्रश्न केंद्रीय समितीचा अहवालच आता स्पष्ट करणार आहे. बीडच्या राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मात्र जलजीवन मिशन घोटाळ्याची चर्चा मात्र जोरदार होत आहे.

## मातंग समाजाने...

दुरच आहे मा.सुप्रिम कोर्टाने अनुसूचित जातीतील आरक्षणाचा लाभ कमी पोहोचलेल्या जातींना प्राधान्य मिळावे यासाठी अनुसूचित जातीतील आरक्षणामध्ये अ ब क ड असे आरक्षण वर्गीकरण करता येते व तसा प्रत्येक राज्यांना अधिकार दिला आहे असा निर्णय दिला आहे आणी देवेंद्र फडणवीस साहेब यांनीही बदर समिती नेमली व या समिती मार्फत लवकरच कार्यवाहीचे आश्वासन दिले आहे म्हणुन या निर्णयाची लवकरात लवकर अंमलबजावणी व्हावी यासाठी लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णु भाऊ कसबे यांनी या आरक्षण क्रांती महापदयात्रेचे आयोजन केले आहे या आरक्षण क्रांती महापदयात्रेस उपस्थित राहणे म्हणजे अनुसूचित जातीतील आरक्षणाचे अ ब क ड आरक्षण वर्गीकरण करणे या विष्णु भाऊ कसबे यांच्या मागणीला पाठिंबा देणे असे आहे आरक्षण क्रांती महापदयात्रा म्हणजे अनुसूचित जातीतील आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिलेल्या समुदायातील घटकांना न्याय मिळवून देण्यासाठीची एक चळवळ आहे या चळवळीला आणि अनुसूचित जातीतील आरक्षणामध्ये अ ब क ड आरक्षण वर्गीकरण या मागणीला पाठिंबा देण्यासाठी आणि समाजाच्या विकासासाठी या आरक्षण क्रांती पदयात्रेस हजारोच्या संख्येने नागपुर येथे १२ डिसेंबर रोजी मातंग समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष दादाराव रोकडे यांनी केले आहे

## जलयुक्त शिवार ...

परिपुर्ण प्रस्ताव जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड या कार्यालयास सादर करावेत. अनुभवी संस्थांना प्राधान्य देण्यात येईल याची नोंद ध्यावी. तसेच शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार मानधनाबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड यांचेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल. प्राप्त प्रस्तावावरती चर्चा करुन सक्षम संस्थेची निवड करण्यात येईल. अधिक माहितीसाठी संपर्क जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जायकवाडी कॉलनी, नगर रोड बीड–४३११२२ येथे संपर्क साधावा. ई–मेल आयडी: cemilsdivbeedgmail.co

## दिव्यांगांच्या हक्कासाठी....

प्रमाणपत्रासाठी होणारी हालअपेष्टा, बसस्थानकांवरील गैरवर्तन, प्रवासातील अडथळे, शिक्षणातील समस्या, तसेच शासन योजनांमधील कमतरता– या प्रत्येक मुद्द्यावर त्यांनी धडाडीने आवाज उठवला.
त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये प्रशासनाला तातडीची कार्यवाही करावी लागली. उपेक्षितांच्या वेदनांना आवाज देणारी त्यांची निर्भीड लेखनशैली आजही जिल्ह्यातील माध्यमांसाठी आदर्श ठरते.
निवड समितीने आपल्या निवेदनात नमूद केले आहे – अण्णासाहेब साबळे यांचे दिव्यांग कल्याण क्षेत्रातील कार्य हे केवळ पत्रकारिता नसून सामाजिक न्यायासाठीचा एक अखंड लढा आहे. त्यांची निर्भीडता, वस्तुनिष्ठता आणि सामाजिक कर्तव्यनिष्ठा यामुळेच त्यांची निवड निश्चित झाली. एक शांत, मनमिळावू पण संकटाच्या क्षणी तितकाच ठाम व आक्रमक पत्रकार म्हणून त्यांनी जिल्ह्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. भीती, दबाव किंवा राजकीय हस्तक्षेपाला न जुमानता दिव्यांगांच्या हक्कांसाठी लढणे– ही त्यांची कार्यशैली नव्या पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.
या पुरस्कारामुळे आष्टी तालुक्यातील दिव्यांग कल्याण क्षेत्राला एक नवीन दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. सामाजिक संस्था, पत्रकार संघटना, मान्यवर, ग्रामस्थ आणि दिव्यांग बांधवांनी अण्णासाहेब साबळे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार लवकरच भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजन समितीने दिली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# तीन जिल्ह्यांत 5 लाख 64 हजार हेक्टरवर पेरा

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या तीन जिल्ह्यांत यंदाच्या रब्बी हंगामात आतापर्यंत ५ लाख ६४ हजार ९१० हेक्टर पेरणी झाली आहे.कृषी विभागाच्या माहितीनुसार, पेरणी झालेल्या क्षेत्रामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्वसाधारण २ लाख ३८ हजार ८२१ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत सुमारे ५७.१६ टक्के म्हणजे १ लाख ३६ हजार ५१८ हेक्टरवर पेरणी झाली आहे. जालना जिल्ह्यात सर्वसाधारण



२ लाख ११ हजार ८१९ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत सुमारे ८०.१६ टक्के म्हणजे १ लाख ६९ हजार ७९५ हेक्टरवर पेरणी झाली आहे.बीड जिल्ह्यात सर्व साधारण २ लाख ७६ हजर ९३३ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत सुमारे ९३.३८ टक्के म्हणजे २ लाख ५८ हजार ५९७ हेक्टरवर रब्बीची पेरणी झाली आहे. सर्वसाधारण क्षेत्राचा विचार करता बीड जिल्हा तीनही जिल्हा रब्बी पेरणीत आघाडीवर असून त्या पाठोपाठ जालना व सर्वात कमी पेरणी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात झाली आहे.

करडईची पेरणी नगण्य– मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर जालना व बीड या तीनही जिल्ह्यात करडईचे सर्वसाधारण क्षेत्र २०२२ हेक्टर इतके आहे. त्या तुलनेत प्रत्यक्षात केवळ २०७ हेक्टर वरच करडईची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या या क्षेत्रामध्ये बीड मधील १७२ हेक्टर जालन्यातील २३ तर छत्रपती संभाजीनगर मधील केवळ १२ आहेत ट्रस्ट क्षेत्राचा समावेशआहे.

एक लाख हेक्टरवर ज्वारी– छत्रपती संभाजीनगर जालना व बीड या तीनही जिल्ह्यात रब्बी ज्वारीचे सर्वसाधारण क्षेत्र दोन लाख ७४ हजार ४६५ हेक्टर इतके आहे. त्या तुलनेत प्रत्यक्षात एक लाख ८६ हजार ३० हेक्टरवर रब्बी ज्वारीची पेरणी झाली आहे. ती सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत ६७.७८ टक्के इतकी आहे. पेरणी झालेल्या रब्बी ज्वारी क्षेत्रामध्ये बीड मधील १ लाख ९ हजार ७४५ हेक्टर या सर्वाधिक क्षेत्रासह, जालन्यातील ५६ हजार ७६१ हेक्टर तर छत्रपती संभाजीनगरमधील १९ हजार ५२४ हेक्टर क्षेत्राचा समावेश असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.

४५ हजार हेक्टरवर मका– जालना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तीनही हंगामात मका पेरणी केली जाते. यंदाच्या रब्बी हंगामात तीनही जिल्ह्यात मक्याच्या सर्वसाधारण ५३ हजार १७२ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत ४५ हजार ७६४ हेक्टर वर मक्याची लागवड झाली आहे. त्यामध्ये बीड जिल्ह्यातील १७८८ हेक्टर क्षेत्रासह जालन्यातील १३ हजार ६०३ व छत्रपती संभाजीनगरमधील ३० हजार ३७३ क्षेत्राचा समावेश आहे.

दोन लाख हेक्टरवर हरभरा– तीनही जिल्ह्यात हरभऱ्याची सर्वसाधारण क्षेत्र २ लाख ३३ हजार ५९६ हेक्टर इतके आहे. त्या तुलनेत प्रत्यक्षात २ लाख १ हजार ६३ हेक्टर वर हरभऱ्याची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या या क्षेत्रामध्ये बीड मधील ९९ हजार ४५६, जालन्यातील ६३ हजार १०४ तर छत्रपती संभाजीनगरमधील ३८ हजार ५०३ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे.

## परिट धोबी समाजाच्या मागण्या तात्काळ पुर्ण करण्यासाठी नागपूर येथे धरणे आंदोनास सुरुवात: ॲड.सुधीर जाधव


### बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे समाज बांधवांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील परिट धोबी समाजाच्या ज्वलंत मागण्या तात्काळ पूर्ण करण्यासाठी सरकारविरोधात नागपूर येथे अखिल भारतीय परिट धोबी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली धरणे आंदोलनास दि.८ डिसेंबर सोमवार रोजी सुरुवात झाली असून राज्यातील परिट धोबी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून लढा यशस्वी करावा असे आवाहन जिल्हाध्यक्ष ॲड.सुधीर जाधव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

याबाबत माहिती अशी की, गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील परीट धोबी समाज, महाराष्ट्र शासनाकडे ,समाजाच्या मागण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. परंतू सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याने सरकारच्या विरोधात बेमुदत साखळी धरणे प्रदर्शन नागपूर येथे करणार आहेत परीट धोबी समाजाच्या मागण्या खालील प्रमाणे आहेत.

१.महाराष्ट्रातील परीट–धोबी समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती मिळण्यासंबंधाने धोबी समाज पुनर्विलोकन समिति गठित करून डी एम भांडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वे करण्यात आला. त्याचा अहवाल सरकारला सादर झाल्यानंतर ,महाराष्ट्र सरकारने सातत्याने चुकीची शिफारस केंद्राला केली. त्यामुळे परिट समाजाला न्याय मिळाला नाही. करिता योग्य शिफारस करून परीट धोबी समाजाला अनुसूचित जातीच्या सवलती पूर्ववत देण्यात याव्यात. २.परीट धोबी समाज व तत्सम समाजासाठी अनेक वेळा



घोषणा करूनही श्री.संत गाडगेबाबा आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित झाले नाही, ते तात्काळ स्थापन करून कार्यान्वित करावे व त्याला भरीव निधी देण्यात यावा. ३.महाराष्ट्रातील ओबीसीच्या यादीत अनेक प्रभावी जाती किंबहुना संख्येने मोठ्या जाती असणार्या लोकांना स्वतंत्र सवलत देण्यात आली. त्यामुळे परीट–धोबी समाज व तत्सम १२ बलुतेदार या जाती उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्यासाठी बारा बलुतेदार या अल्पसंख्य ओबीसीला विशेष मागासवर्ग म्हणून स्वतंत्र सवलत देण्यात यावी. ४.राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना भारतरत्न म्हणून भारत सरकारने घोषित करावे त्यासाठी महाराष्ट्र सरकारची तात्काळ शिफारस केंद्र शासनाला पाठवण्यात यावी. ५.भारत सरकारने स्थापन केलेल्या सफाई कामगार यादीत भारतातील रजक–धोबी समाज सामील असल्याने महाराष्ट्रातही पारिट–धोबी समाजाला या सफाई कामगार म्हणून स्वतंत्र सहकार्य करण्यात यावे. ६. हैदराबाद गॅझेट चा आधार घेऊन तेलंगणामध्ये परिट–धोबी समाजाला ओबीसी मध्ये विशेष दर्जा देण्यात आला आहे, तो दर्जा महाराष्ट्रातही तात्काळ देण्यात यावा. या सर्व मागण्या मान्य करून, महाराष्ट्रातील परीट धोबी समाजाला न्याय देण्यात यावा. अन्यथा हा महाराष्ट्रातील परीट धोबी समाज दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पासून नागपूर येथे राज्यव्यापी साखळी धरणे प्रदर्शन करणार असल्याचे समाज बांधव तसेच सकल धोबी समाज आरक्षण समन्वय समितीच्या वतीने तसेच महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष गणेश जगताप बीड जिल्हाध्यक्ष ॲड.सुधीर जाधव, शहराध्यक्ष अंबादास नवले, पप्पू शिंदे, विलास जाधव, जयंत राऊत, अजय जाधव, मनोज वाघमारे, बीड जिल्हा सचिव प्रवीण साळुंके,उपाध्यक्ष जिजा शिंदे, कार्याध्यक्ष संजय साळुंके, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर सचिव अतुल साळुंके, कार्याध्यक्ष संतोष भालेकर, शितल राऊत, अमोल काळे, संदीप जाधव, प्रा. विजय जाधव, मनोज नवले, गणेश धोंगडे, विकी नवले, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, गणेश राऊत,मनोज नवले,जगन्नाथ शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संत केदारी महाराज साधना स्थळ हकाऱ्यामाळ येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**परळी । प्रतिनिधी**

तालुक्यातील वैजवाडी येथील श्री गुरु संत केदारी महाराज साधना स्थळ हकाऱ्यामाळ येथे १३ ते २० डिसेंबर २०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताह निमित्त महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार गायक वादक आणि भजन असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत सोपान काका महाराज उखळीकर फडाच्या वतीने करण्यात आले आहे.

परळी पंचक्रोशीतील सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होतो की श्री संत केदारी महाराज यांच्या पदपरश्याने पावन झालेल्या हकाऱ्या माळ येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पंचक्रोशीतील भाविक भक्तांच्या सहकार्याने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले



आहे श्री संत केदारी महाराजांनी हकाऱ्या माळावर बरीच वर्ष भजनाची साधना केलेली आहे त्याच ठिकाणी श्री संत सोपान काका महाराजांनी पंचक्रोशीतील टाळकरी व अन्नदात्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाची सुरुवात केली पुढे वैकुंठ ह भ प पंढरीनाथ महाराज वैकुंठ उत्तम महाराज उखळीकरांनी या कार्यक्रमाची जोपासना केली आणि मार्गशीष अमावस्येला या यात्रा भरवली आजही या यात्रेनिमित्त भाविक श्री संत केदारी महाराजांच्या दर्शनासाठी आवर्जून येतात आजही कार्यक्रमाची जोमाने वाटचाल सुरू आहे तरी भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहात सर श्रवणमृताचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा तसेच ह भ प भागवतचार्य संतोष महाराज वनवे, ह भ प भागवताचार्य अच्युत महाराज डोंगरे, ह भ प चैतन्य महाराज उखळीकर, ह भ प भागवताचार्य वासुदेवानंद महाराज शास्त्री, ह भ प भागवताचार्य केशव महाराज घुले टाकळीकर, ह भ प भागवताचार्य बाळ महाराज उखळीकर, ह भ प रामकृष्ण महाराज सानप येवला यांची कीर्तन सेवा होणार आहे तर २० डिसेंबर रोजी पहाटे पाच ते सात काल्याचे किर्तन ह भ प भागवताचार्य माधव महाराज उखळीकर यांचे होणार आहे तरी भाविकांनी या सर्व सप्ताहातील धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प केशव महाराज, ह भ प विठ्ठल महाराज उखळीकर, उखळीकर ह भ प विश्वंभर महाराज उखळीकर,

## हज यात्रेकरूंचे स्वागतसरपंच भिमराव बोडखे यांचा भाईचारा



**आष्टी । प्रतिनिधी**

आदर्श गाव सराटेवडगाव/ आनंदवाडी येथील मुस्लीम बांधव सौदी अरेबिया या देशातील पवित्र स्थळ मक्का– मदिना हज– उमरा यात्रा करून सुखरूप आपल्या गावी पोहोचले.हज झाले तर जीवनाचा सार झाला असे म्हणतात ही यात्रा आत्मशुद्धीसाठी व अल्लाहशी जवळीक साधण्यासाठी शुद्धीकरण व आत्मिक उन्नतीसाठी महत्त्वाची मानली जाते. हज यात्रेवरून गावी पोहोचल्यानंतर नेहमीच बंधू भावाने वागणारे आदर्श गाव सराटेवडगाव/आनंदवाडी चे सरपंच श्री.भिमराव बोडखे यांनी हज यात्रेकरूंचे मुस्लिम रीतीरिवाजाप्रमाणे स्वागत केले यामध्ये सामाजिक कार्यकर्ते जेष्ठ नागरिक रशीद भाई शेख,अन्सार भाई शेख (PSI), शब्बीर भाई शेख चेअरमन (बाभुळगाव खा ),इंजिनिअर अझहर शेख, जालिंदर भाई शेख, इसाक भाई शेख, जावेद भाई, जैतूनबी शेख अम्माजी, अफसाना मॅडम, खातून शेख, मदिना शेख, मुस्कान शेख, हमीद शेख, तायरा शेख, यांना हज यात्रेचे दर्शन घडून आणण्यासाठी शब्बीर भाई शेख पूनावाले यांनी अथक परिश्रम घेतले या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी उपसरपंच लहू आबा तरटे, माजी उपसरपंच विष्णू झगडे, माजी उपसरपंच महादेव शिंदे, सर्व ग्रा.पं. सदस्य, तान्हाजी सुंबरे पाटील, देविदास गायकवाड साहेब, अतिक शेख सर, बाबा भाई शेख, शरीफखान पठाण साहेब, बादशहा भाई शेख, उस्मान भाई प्रा.अझहर शेख, इमाम भाई, आसिफ भाई, आयुब भाई, जाकीर हुसेन आदि ग्रामस्थ उपस्थित होते

## भव्य शोभायात्रेने माँ कनकेश्वरीच्या शिव महापुराण कथेस प्रारंभ

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील समस्त राजस्थानी समाज व श्री.सद्‌गुरु सत्संग गोसेवा समितीच्या वतीने कौशल्यादेवी बजाज मैदान मंगलनाथ बायपास रोड आयोजित माँ कनकेश्वरी देवी यांच्या श्री शिवमहापुरान कथेला भव्य दिव्य शोभा यात्रेने आज प्रारंभ झाला. कथेच्या प्रथम दिनी भव्य



दिव्य शोभायात्रा काढून कथेला सुरुवात केली आहे या शोभायात्रात ढोल ताशा पथक पुणे येथील व श्री सिद्धेश्वर विद्यालयाच्या मुलाचे ढोलताशा पथक व माजलगावाती प्रसिद्ध बॅन्ड ने वाजतगाजत शिवपुराण पोथीची मिरवणूक काढण्यात आली होती या शोभायात्रेत महादेव पार्वती ची झाकी,कलशधारी महिला लहान मुले,मुली व महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कऱ्हेवडगावच्या सरपंच वंदना गायकवाड यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर

**आष्टी । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने प्रथमच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'जिजाऊ माँसाहेब आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे. यावर्षीचा आदर्श सरपंच पुरस्कार कऱ्हेवडगावच्या सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या



संचालिका वंदना परिवंत गायकवाड यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे यांनी दिली. सौ वंदना गायकवाड व गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड हे गेल्या २५ वर्षापासून सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असतात मागील पाच वर्षापासून त्या कऱ्हेवडगावच्या सरपंच पदाचा कारभार पाहत आहेत.

## श्री क्षेत्र दत्तधाम येथे दत्त जन्मोत्सव भक्तिभावात व उत्साहात साजरा

**परळी । प्रतिनिधी**

भगवान शंकराचार्य महाराजांनी प्रतिकाशीचा मान दिलेल्या श्री क्षेत्र दत्तधाम येथे दत्त जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात व आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी ८ ते १० या वेळेत रुद्राभिषेक पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. परिसरात मंत्रोच्चार, भक्तीभाव आणि चैतन्यपूर्ण ऊर्जा अनुभवायला मिळत होती.

यावेळी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज म्हणाले, भगवान दत्तात्रेय हे समस्त विश्वाचे मार्गदर्शक असून दत्त उपासनेतून मनाला परम शांती प्राप्त होते. माणसाने आपल्या जीवनात नियमबद्धता आणली पाहिजे, स्वतःवर संयम ठेवत सातत्याने चांगले कर्म करावे, हाच खरा ईश्वरपूजनाचा मार्ग आहे. आपणच आपले भवितव्य



घडवत असतो, हे लक्षात घेऊन जीवनात सकारात्मकतेने वाटचाल करावी, असे मौलिक विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या पवित्र तीर्थक्षेत्री औदुंबर वृक्ष, गोमातेचे व धुनीचे दर्शन भाविकांना लाभते. येथे आल्यानंतर सकारात्मक ऊर्जा, चैतन्य आणि मानसिक शांती लाभते, अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. या प्रसंगी प्रभू राम आंधळे (मरळवाडी) यांच्या सौजन्याने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच देहू आघाव यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास उद्योजक मधुकर आघाव, संजयजी आघाव, श्रीहरी गुट्टे, प्रभाकर दहिफळे, शिवसेना महाराष्ट्र समन्वयक फुलचंदराव कराड, संदीपान आंधळे, माजी सरपंच विठ्ठल गुट्टे, भाष्कर गुट्टे यांच्यासह अनेक मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे येथे प्राचार्य देवराम सारोक्ते व पत्रकार अर्जुन मुंडे यांना संविधान गौरव पुरस्कार प्रदान

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव (बु.) येथील जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य देवराम गोगा सारोक्ते व दैनिक राज्य लोकतंत्रचे वडवणी तालुका प्रतिनिधी तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई वडवणी शाखेचे सचिव पत्रकार अर्जुन निवृत्ती मुंडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी,शेतकरी यांच्यासाठी तसेच शैक्षणिक,सामाजिक,पत्रकारिता या क्षेत्रात भरीव कार्य केल्याबद्दल दि बुद्धिस्ट विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या सेवा भावी संस्थेने प्रतिष्ठित असलेला राज्यस्तरीय संविधान गौरव पुरस्कार–२०२५ नुकताच जाहीर करण्यात आला होता. हा पुरस्काराचे वितरण सोहळा ७५ व्या संविधान दिनाचे अमृत महोत्सव निमित्त दि बुद्धिस्ट



विकास फाउंडेशन महाराष्ट्र राज्य व बांधकामगार श्रमिक सेना यांच्या संयुक्त विद्यमाने गौरव संविधानाचा विशेष कार्यक्रमाचा आयोजन दि.३० नोव्हेंबर २०२५ रविवार रोजी ०२ ते ०६ या वेळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक,भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक पिंपरी–चिंचवड पुणे या ठिकाणी संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मा.श्री. अण्णासाहेब बनसोडे महाराष्ट्र राज्य विधानसभा उपाध्यक्ष तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.श्री.इंजि.देवेंद्र तायडे शहरआध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड, मा.श्री. सुकुमार कांबळे , प्रसिद्ध गायक साजन बेंद्रे ,कांचन वाघमारे, कार्यक्रमाचे संयोजक मा.श्री. शिवाजीराव झोडगे,रवी कांबळे सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत भारतीय संविधानाची प्रत,स्मृतीचिन्ह,प्रशस्तिपत्र देऊन प्राचार्य देवराम सारोक्ते व पत्रकार अर्जुन मुंडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्यामुळे आणखीन शैक्षणिक सामाजिक कार्य करण्यासाठी बळ व प्रेरणा मिळाली आहे अशी प्रतिक्रिया पुरस्कार स्वीकारल्यानंतर त्यांनी दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्याला वडवणी येथील श्री.निवांत रामचंद्र सस्ते साहेब(कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी)श्री.निलेश अनेराव(इंजिनियर).श्री.ऋषिकांत तांदळे सर (मुख्याध्यापक, साने गुरुजी माध्यमिक विद्यालय,परभणी के ),श्री.समाधान उजगरे सर (साने गुरूजी माध्यमिक विद्यालय परभणी .के).श्री.बाळासाहेब सावंत, श्री.बबन शेळकंदे ,श्री. रोहित सारोक्ते यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी तथा धर्मादाय उप–आयुक्त कार्यालय, बीड.**

प्रेमपद्म (नहार) बिल्डींग, औटी मंगल कार्यालयाजवळ, एस.बी.आय. समोर, जालना रोड, बीड– ४३११२२.

संख्या नोंदणी प्रकरण क्र. ५७३/२५

नियोजीत न्यासाचे नांव:– वेट्न्स क्रिकेट असोसिएशन फॉर महाराष्ट्र, मु. पो. राज हॉटेल बस स्टँड जवळ, बीड ता. जि. बीड

अर्जदार :– श्री किशोर माणीकराव जगताप–उपाध्यक्ष

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक संस्था, निबंधक, बीड विभाग बीड हे वर नमुद केलेल्या अर्ज यांसबंधी संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये चौकशी करणार आहेत. वर नमुद केलेली संस्था अस्तीत्वात आहे काय? आणी सदरची संस्था सार्वजनिक स्वरुपाची आहे काय? सदर संस्थेच्या नावाबाबत कोणाची हरकत आहे काय?

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारेखेपासून ३० (तीस) दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने स्वत: हजर राहुन किंवा विधीज्ञामार्फत पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मा. सहाय्यक संस्था निबंधक, बीड यांचे शीक्यानिशी आज दिनांक ०९.१२.२०२५ रोजी दिली.

(स्वाक्षरीत)
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बीड विभाग बीड

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :– १८१२/२०२५

अर्जदार :– १. शेख शानुरवी अल्लाउद्दीन, वय – ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुर्ला, ता. जि.बीड, २. रहिम अल्लाउद्दीन शेख, वय– ४९ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ३. हसीम अल्लाउद्दीन शेख, वय ३७ वर्षे, धंदा – मजुरी, रा.वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे अल्लाउद्दीन शेख पि. अहमदभाई हे / हया दिनांक २६/०९/२०२५ रोजी बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत आहेत. मयतास मुलगी नाही.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– ०४/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:– १२/०१/२०२६.

( मार्फत विधिज्ञ:– ॲड डी. डी. मस्के )

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. १० डिसेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### बीड जिल्हा अंतर्गत राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया सन २०२५ अंतर्गत उन्हाळी तीळ पिकांच्या १००% अनुदानावर प्रमाणित बियाणे वितरण करिता शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन.

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (NMEO-CS) हे खाद्यतेलांच्या आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत तेलबियांचे उत्पादन वाढवून आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारून आत्मनिर्भरतेकडे जाण्यासाठी तयार केले गेले आहे. अभियानांतर्गत पिकाची उत्पादकता वाढ व सुधारित वाणांच्या प्रसारासाठी उन्हाळी तिळासाठी हेक्टरी २.५ किलो (रक्कम रु.१९७/किलो) प्रमाणित बियाणे केंद्र शासनाने निवड केलेल्या जिल्ह्यांना १००% अनुदानावर वितरित करण्यात येणार आहे. यामध्ये तिळ पिकाचे १००% अनुदानावर प्रमाणित बियाणे चा लाभ बीड, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना द्यावयाचा आहे. यासाठी प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर व कमाल १ हेक्टर मर्यादित लाभ देय आहे. शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांचा उन्हाळी तिळासाठी ५०० ग्रॅम किंवा १ किलो याप्रमाणे पॅकिंग साईज आहे. शेतकऱ्यांना बियाण्याच्या पॅकिंग साईज नुसार प्रमाणित बियाणे वितरित करण्यात येईल. त्यामुळे क्षेत्रानुसार आवश्यक बियाण्यापेक्षा पॅकिंग साईज नुसार अधिकचे बियाणे परीगणित होत असल्यास याकरिताची रक्कम शेतकऱ्यांनी स्वहिश्याने भरावी लागेल. तीळ पिकाच्या बियाण्याचा लाभ घेण्यासाठी चरहरउ्रढ ऋ्रीशी (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer-gr/Login/-grilLogin) या संकेतस्थळावर प्रमाणित बियाणे वितरण, प्रात्याक्षिके, फ्लेक्झि घटक औषधे आणि खते या टाईल अंतर्गत सुविधा उपलब्ध करून दिली आहे.१०० % अनुदानावर प्रमाणित बियाणे वितरण या घटकासाठी अर्ज सादर करण्यासाठी शेतकऱ्यांची -सीळीींरलज्ञ वर नोंदणी असणे बंधनकारक ▶ उर्वरित पान २ वर

# भरारी पथकाने बोगस खत विक्री करणाऱ्या कंपनी व कृषी सेवा केंद्र यांच्यावर FIR दाखल केला

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, आशीष काळूसे, तंत्र अधिकारी गु. नि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख साहिल सय्यद, कृषी विकास अधिकारी जिल्हा परीषद सायप्पा गरांडे मोहीम अधिकारी जिल्हा परीषद वल्लभ



भोसले जिल्हा गुण नियंत्रण निरिक्षक यांच्या उपस्थितीत गणेश हिरे खत निरिक्षक तथा कृषी अधिकारी (गु.नि.) गेवराई यांनी भोगस खत विक्री करणारे काव्या अग्रो चे प्रतिनिधी राधेशाम काकडे व खत पुरवठा करणारी कंपनी विदूत अग्रो केम प्रा. लि. रायगड चे संचालक निखील कासोळे यांच्या विरूद गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मिळालेल्या गुप्त माहितिच्या आधारे काल दिनांक ८ डिंसेबर २०२५ रोजी भरारी पथकाने काव्या आग्रो मोंढा रोड गेवरा जिल्हा बीड येथे तपासणी केली असता सदरील ठिकाणी मिश्र खताचे ग्रेड NPK 10:20:20 d 20: 20: 00. पुढील मजकुराचे एकुन ५५ बॅग (प्रति बॅग 50kg) असल्याचे आढळून आले.

१) खताचे नाव - NPK 10:20:20 (Granulated Mizu Fertiliser)-37 Bag d NPK-20:20:00 (GranulatedMix fertilizer)-18 Bag, २) उत्पादकाचे नाव - मे. Sivaji -Agro crops जालना, ३) खताचा ब्रँड - जय किसान, ४) विपणन कर्त्याचे नाव: Vidyut -Agro chem. Pvt. Ltd sec. 18 SNo-6. New Panvel Raigad -410206. याबाबत काव्या आग्रो यांना खताचे खरेदी बिले मागितले ▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा येथील छत्रपति शिवाजी महाराज चौक ते जुने बस स्थानक डॉ बाबासाहेब आंबेडकर चौका पर्यंतचा डांबरी रस्ता होणार कधी ?

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर रस्ता रोको आंदोलन करणार !

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील व्यावसायिक दृष्ट्या जवळपास कमी जास्त प्रमाणात सदुसष्ट गावाचा जनसंपर्क होत आसतांना गावात जाणारा मुख्य डांबरी रस्ता छत्रपति शिवाजी महाराज चौक ते जुने बस स्थानक डॉ. बाबासाहेब अंबेडकर चौक हा होणार कधी आसा प्रश्न गावकऱ्यातुन सातत्याने उपस्थित केला जात आसतांना राजकिय मंडळी व सार्वजनिक रस्ता बांधकाम विभाग मात्र या कडे काना डोळा करत असल्याचे बोलल्या जात आहे. या बाबत अधिक माहीती आशी तलबाडा येथील छत्रपति शिवाजी महाराज चौक ते जुने बस स्थानक डॉ बाबासाहेब



आंबेडकर चौका पर्यंतचा डांबरी रस्ता खड्चात रस्ता आहे की रस्त्यात खंडे आहेत हे आणेकांना ऊमजत नसले तरी या रस्त्याने जाणा-या येणा-या वाहन धारक व पाई चालणा-या वाटसरुंना एक किलोमीटरचा हा रस्ता आणेक प्रकारे वेदनादाई ठरत आहे. पाई चालतांना शाळकरी विध्यार्थ्यांसह वयोवृद्ध महिला पुरुषांना पाय मुरडने लचके बसने चालतांना तोल जाने आस्या प्रकारे यातना भोगाव्या लागत असुन वाहन चालकांचा तर खड्यांमुळे आणेक वेळा वाहनावरचा ताबा सुटलेला आहे याच रस्त्यावर ऊसाचे ट्रॅक्टर पलटी झालेचे ताजे ऊधारण आहे. सुदैवाने आणेक दुर्घटना होता होता राहिलेल्या आसल्याचे वाटसरु सह नागरिकांकडुन समझते. या बाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व त्यांच्या सर्व पदाधिका-यांनी या रस्त्या बाबत प्रशासनास निवेदन देऊन तात्काळ रस्ता कामास ▶ उर्वरित पान २ वर

# शौचालय वापरात नसल्याने विद्यार्थ्यांना जावे लागते घरी !

### कोंबडं वस्ती जिल्हा परिषद शाळेतील धक्कादायक प्रकार

**● कागदोपत्रीच मोहीम राबवल्याबद्दल सीईओंनाच पुरस्कार द्या ! - डॉ. गणेश ढवळे**


**लिंबागणेश । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशांनुसार 'जागतिक शौचालय दिना'पासून ते 'मानवी हक्क दिना'पर्यंत म्हणजे १९ नोव्हेंबर



ते १० डिसेंबर या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात हमारा शौचालय - हमारा अभिमान ही विशेष मोहीम राबविण्याचे आदेश जिल्हा परिषद प्रशासनाने दिले. जिल्ह्यातील १३५६ गावांमध्ये वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती, रंगरंगोटी व नियमित वापर सुनिश्चित करण्यात यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले. शौचालय म्हणजे केवळ सुविधा नव्हे तर आरोग्य, सुरक्षितता व प्रतिष्ठेची हमी असल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र प्रत्यक्षात काय? अभियान फक्त कागदोपत्रीच राबवले जात असल्याचे वास्तव पुन्हा समोर आले आहे.कोंबडं वस्ति शाळेची शौचालये अनेक वर्षांपासूनच बंद! विद्यार्थ्यांची बिकट अवस्था बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील लिंबागणेश ▶ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश परिसरात बिबट्यांची वाढती हालचाल ; शेतकरी भयभीत



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्याने ग्रामस्थ व शेतकरी भयभीत झाले आहेत. रात्रीच्या वेळी कृषी पंपांचे विद्युतपुरवठा सुरू असल्याने शेतकऱ्यांना अंधारात शेतात जावे लागते आणि त्यामुळे त्यांच्या जिवीतास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा नियमित विद्युतपुरवठा सुरू करावा, या मुख्य मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे जिल्हा अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि. ११ डिसेंबर, गुरुवार रोजी लिंबागणेश बसस्थानक येथे रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असल्याची लेखी नोटीस जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता महावितरण बीड व सहाय्यक अभियंता उपकेंद्र लिंबागणेश यांना देण्यात आली आहे. पोखरी व पिंपरनई परिसरातील शेतकऱ्यांनी बिबट्यांचा वावर वाढल्याची माहिती दिल्याने भीतीचे वातावरण अधिक गडद झाले आहे. जिल्ह्यात बिबट्यांच्या ▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात 1892 कोटींच्या जलजीवन मिशनमध्ये घोटाळा !

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या तब्बल १८९२ कोटी रुपयांच्या कामांवर अखेर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले असून, प्रचंड निधी मिळाल्यानंतरही प्रत्यक्षात अत्यल्प कामे पूर्ण झाल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय लेखा-परीक्षण समिती बीडमध्ये दाखल झाली आहे. या समितीचा अहवाल संपूर्ण जिल्ह्यातील पाणीपुरवठा व्यवस्थेतील 'खरी' परिस्थिती उघड करणारा ठरेल,




अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. जलजीवन मिशनअंतर्गत बीड जिल्ह्यासाठी गेल्या काही वर्षांत १८९२ कोटी रुपयांचा प्रचंड निधी उपलब्ध झाला. हा निधी ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत नवनवीन योजना पूर्ण करण्यासाठी वापरण्यात येणार होता. प्रत्यक्षात मात्र अनेक योजना कागदावर ठळकपणे दिसत असल्या तरी गावांमध्ये पिण्याचे पाणी आजही पोहोचलेले नाही. काही ठिकाणी सुरुवातीची 'फोटोसेशन' स्वरूपातील कामे झाली, तर अनेक गावे आजही 'नळ येणार' या आशेवर आहेत.

योजना होऊन देखील नळ कोरडेच हे जलजीवन मिशनच्या कामाचे सत्य आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जलजीवन मिशन मध्ये गुत्तेदारांना प्रचंड पोसल्याचा आरोप आहेत. मात्र गेल्या वर्षभरापासून त्यांचीही बिलेच निघालेली नसल्याने काही गुत्तेदारांनी अर्धवट कामे सोडून पळ काढला ▶ उर्वरित पान २ वर

## मातंग समाजाने आरक्षणात समान संधीची समानता मिळवण्यासाठी नागपूर येथे आरक्षण क्रांती महापदयात्रेस उपस्थित राहावे: दादाराव रोकडे

**तलवाडा। प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती प्रवर्गासाठी लागू केलेल्या आरक्षणाचा लाभ समाजातील ठराविक घटकांपर्यंत पोहोचत नसल्याच्या तक्रारी अनेक वर्षांपासून आहेत. या पार्श्वभूमीवर, आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिलेल्या महाराष्ट्रातील मातंग समाज व मातंग समाजातील तत्सम जातींनी एकत्र येत आपल्या न्याय्य हक्कांसाठी अनेक वर्षांपासून एल्गार पुकारला आहे. त्यातच लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णु भाऊ कसबे यांनी मुंबई ते नागपुर पायी आरक्षण क्रांती महापदयात्रेस सुरुवात केली आहे हि आरक्षण क्रांती महापदयात्रा हजारो मातंग समाज बांधवांसह १२डिसेंबर रोजी नागपुर हिवाळी अधिवेशनानिमित्त विधानभवनावर धडकणार आहे या महापदयात्रेत अनुसूचित जातीतील आरक्षणाचे अ ब क ड असे वर्गीकरण करून मातंग समाजाला स्वतंत्र कोटा मिळावा ही मुख्य मागणी आहे. सध्याच्या एकत्रित आरक्षणामुळे तुलनेने प्रबळ आणी प्रगत असलेल्या जाती संपूर्ण या आरक्षणाचा लाभ घेतात, तर मातंग समाज व मातंग समाजातील तत्सम जाती या सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संधींपासून कायम वर्षानुवर्षे ▶ उर्वरित पान २ वर

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संत जगनाडे महाराज जयंती निमित्ताने अभिवादन

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संत जगनाडे महाराज यांच्या जयंती निमित्ताने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष



वायाळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार, सदस्य प्रा. बाळासाहेब जोगदंड, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. सिध्देश्वर काळे याबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांचे उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## जलयुक्त शिवार २.0 योजने अंतर्गत समाविष्ठ असलेल्या कामांचे त्रयस्थ मुल्यमापनासाठी खालील संस्था पात्रता

**बीड । प्रतिनिधी**

जलयुक्त शिवार २.० अभियान महाराष्ट्रामध्ये राबविण्यात येत आहे. सदर अभियाना अंतर्गत होणा-या कामाचे त्रयस्थ मुल्यमापण करण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाचे प्राप्त शासनाच्या निर्देशानुसार बीड जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार २.० अंतर्गत झालेल्या सर्व कामांचे त्रयस्थ मुल्यमापनासाठी खालील संस्था पात्र राहतील असे जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा जिल्हा प्रगणना नोडल अधिकारी मृद व जलसंधारण विभाग बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालय, जलसंधारण कामांचा अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्था, ISO मानांकित खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालय.बीड जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार २.० अंतर्गत झालेल्या कामांचे त्रयस्थ मुल्यमापन काम करण्यास इच्छुक संस्थांनी दि.५ डिसेंबर २०२५ पर्यंत आपले ▶ उर्वरित पान २ वर

## दिव्यांगांच्या हक्कासाठी लढणारा निर्भीड आवाज

### पत्रकार अण्णासाहेब साबळे 'जिजाऊ माँसाहेब आदर्श दिव्यांग पत्रकार पुरस्कार २०२६' साठी घोषित

**आष्टी । प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांच्या न्याय, हक्क आणि सन्मानासाठी गेली अनेक वर्षे अविरत लढा देणारे, माळी गल्ली, आष्टी (जि. बीड) येथील प्रखर सामाजिक बांधिलकी असलेले पत्रकार अण्णासाहेब दिनकर साबळे यांची प्रतिष्ठेच्या 'जिजाऊ माँसाहेब आदर्श दिव्यांग पत्रकार पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आल्याची घोषणा मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी तर्फे



करण्यात आली. या निवडीची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार सीताराम पोकळे यांनी दिली. तानुबाई बिरजे पत्रकार परिषदेतर्फे यावर्षी प्रथमच राज्यस्तरावर विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय व लोकहितवादी कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'जिजाऊ माँसाहेब आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार' देण्यात येणार आहेत. त्यामध्ये दिव्यांग कल्याण व सामाजिक पत्रकारितेतील विशेष योगदानाबद्दल अण्णासाहेब साबळे यांच्या नावाची निवड करण्यात आली आहे. दिव्यांग सुविधा केंद्रातील त्रुटी, मेडिकल ▶ उर्वरित पान २ वर

# आष्टी भूमिअभिलेख कार्यालयातील कारभाराला चाप बसणार का ?

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयाचा कारभार गेल्या काही महिन्यांत नागरिकांच्या सहनशीलतेची अंत झाला होता. प्रभारी उपाधीक्षक असल्याने त्यांचा कोणावर वचक नसल्यामुळे शेकडो फेरफार, मोजण्या, नकाशे, वारस नोंदी, गुंठेवारी, अकृषी असे अनेक




प्रलंबित प्रकरणांची साखळी तयार झाली होती.

कार्यालयात कोणाचाच कोणावर वचक नसल्याने काम उद्यापरवानंतर या। अश्या एका वाक्यावर कार्यालयाचा कारभार उभा राहिला होता. आता उपअधीक्षक मोरे सी. एस. यांनी पदभार स्वीकारल्यानंतर नवीन आशेचा किरण नागरिकांना दिसू लागला आहे. परंतु मोरे यांच्या आगमनाने कार्यालयाचा गाडा पुन्हा गतिमान होणार का? की काही दिवसांतच पुन्हा तीच जुनी टोलवाटोलवी, सव्हर बंदची सबब, शिपायाचा हस्तक्षेप आणि राजकीय दबाव सुरू राहणार का? हा मोठा प्रश्न आहे मागील उपअधीक्षकांच्या काळात भूमी अभिलेख विभागात गेले काही महिने विविध तक्रारी, कामकाजातील विलंब, नागरिकांची होण ारी गैरसोय आणि व्यवहार प्रलंबित राहिल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. कोणाचाच कोणावर वचक नव्हता आता पुणे येथून पदोनती

बीड जिल्ह्यात १८९२ कोटींच्या जलजीवन मिशनमध्ये घोटाळा !

होऊन आलेले या क्षेत्रात २१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभवी असलेले नवीन अधिकारी मोरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सर्वांच्याच नजरा आता त्यांच्या कामकाजावर लागल्या आहेत. जुनी अडचण, अपार कामाचा ताण आणि शिस्तबद्धतेचा अभाव या तिघांशी दोन हात करताना मोरे यांनी कारभारात पारदर्शकता व गती आणणे हेच खरे आव्हान ठरणार आहे. नागरिकांना दिलासा देणारा कारभार सुरू होणार का? कागदोपत्री कामकाजातील विलंबाला लगाम बसणार का? अनियमिततेवर कारवाई होणार का? या सर्व प्रश्नांची उत्तरे पुढील काही दिवसांत स्पष्ट होतील. स्थानिक जनतेत मात्र सकारात्मक बदलाची अपेक्षा वाढली आहे.